सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

इंडिया आघाडीची उद्या बैठक

नवी दिल्ली : केंद्र सरकारने डिलिमिटेशन व महिला आरक्षण विधेयकाला मंजुरी दिली आहे. हे विधेयक आगामी विशेष अधिवेशनात पारीत करुन घेण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. या संदर्भात चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीची उद्या तातडीची बैठक बोलाविण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत डिलिमिटेशन व महिला आरक्षण विधेयक बिलाला मंजुरी देण्यात आली. ३० नोव्हेंबरपासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या अधिवेशनात हे विधेयक मंजुर करुन घेण्याच्या भाजपकडून हालचाली सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर एकत्रितपणे विरोध करण्यासाठी शनिवारी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीची बैठक बोलाविण्यात आली आहे.

• वर्ष २५ वे • अंक ६१ • शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

डिलिमिटेशन आणि महिला आरक्षण विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी



लोकसभेत खासदारांची संख्या ८५०;राजकीय हालचालींना वेग

नवी दिल्ली:लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) आणि महिला आरक्षणाशी संबंधित महत्त्वपूर्ण घटना दुरुस्ती विधेयकाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या विधेयकानुसार लोकसभेतील खासदारांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवून ८५० करण्यात येणार आहे. तसेच २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे देशाच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

केंद्र सरकारने यापूर्वी एप्रिल महिन्यात लोकसभेत हे घटना दुरुस्ती विधेयक मांडले होते. मात्र, आवश्यक दोन तृतीयांश बहुमत मिळवण्यात अपयश आल्याने विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते. आता पुन्हा एकदा हे विधेयक संसदेत मांडण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यासाठी सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. नव्या विधेयकानुसार देशातील सर्व राज्यांमधील लोकसभेच्या जागांमध्ये सरसकट ५० टक्के वाढ करण्याची तरतूद आहे. त्यामुळे लोकसभेची सदस्यसंख्या ८५० पर्यंत पोहोचणार आहे. विशेष म्हणजे, पुढील २५ वर्षे म्हणजेच २०५१ पर्यंत लोकसभेच्या जागांची संख्या स्थिर ठेवण्याची तरतूदही प्रस्तावित करण्यात आली आहे. या पुनर्रचनेच्या माध्यमातून महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षणाचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे.

डिलिमिटेशन प्रक्रियेत लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या सीमा नव्याने निश्चित केल्या जातात. केंद्राच्या प्रस्तावानुसार जागावाढीनंतर राज्यांमधील जागांचे प्रमाण पुढील २५ वर्षे म्हणजे २०५१ पर्यंत कायम ठेवण्याची तरतूद आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची फेररचना झाल्यास दक्षिण भारतातील राज्यांचे राजकीय प्रतिनिधित्व कमी होण्याची व्यक्त केली जाणारी भीती दूर करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

द्रमुकच्या दोन्ही अटी मान्य;भूमिकेकडे लक्ष

दरम्यान, या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी द्रमुकने केंद्र सरकारसमोर दोन प्रमुख अटी ठेवल्या होत्या. तमिळनाडूचे लोकसभेतील विद्यमान प्रतिनिधित्व कायम ठेवावे आणि पुढील २५ वर्षे लोकसभेची सदस्यसंख्या स्थिर ठेवावी, अशी द्रमुकची मागणी होती. या दोन्ही अटी केंद्र सरकारने मान्य केल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे द्रमुकच्या २२ खासदारांचा विधेयकाला पाठिंबा मिळण्याची शक्यता वाढली आहे.. मात्र, विधेयकाचा अधिकृत मसुदा तपासल्यानंतरच पाठिंब्याबाबत अंतिम निर्णय घेणार असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे.

लोकसभेत घटना दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी ३६० खासदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. द्रमुकच्या संभाव्य पाठिंब्यामुळे सत्ताधारी एनडीएची बाजू अधिक मजबूत होऊ शकते. दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खा.संजय राऊत यांनी या विधेयकावरून केंद्र सरकारवर टीका केली आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रस्ताव पुढे आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या खासदारांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. खासदारांच्या खरेदी-विक्रीसाठी १५० कोटी रुपयांचे व्यवहार होत असल्याचा गंभीर आरोपही राऊत यांनी केला. महिला आरक्षणाची अंमलबजावणी, **पान ४ वर**

मतदारसंघ पुनर्रचनेवर शरद पवार गटाची भूमिका गुलदस्त्यात!

सुप्रिया सुळेंनी सस्पेन्स वाढला;खासदारांना व्हीप जारी

मुंबई/प्रतिनिधी-केंद्र सरकारने ३० नोव्हेंबरपासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या हालचाली सुरू केल्यापासून राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. पक्षाचे लोकसभेतील प्रतोद खा.डॉ. अमोल कोल्हे यांनी सर्व खासदारांना तीन ओळींचा व्हीप जारी केला आहे. मात्र, हा व्हीप केवळ अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी असल्याचे खा.सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केल्याने शरद पवार गटाच्या भूमिके बाबतचा सस्पेन्स कायम आहे.

मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करताना सावध पवित्रा घेतला. त्या म्हणाल्या, संसदेचे अधिवेशन जाहीर झाले असले तरी त्याचा अजेंडा अद्याप आपल्याला माहिती नाही. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकही आपण पाहिलेले नाही. त्यामुळे विधेयकाचा अभ्यास केल्याशिवाय त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. खासदारांना जारी केलेला व्हीप हा अधिवेशनाच्या कामकाजाला उपस्थित राहण्यासाठी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सुळे **पान ४ वर**

पुण्यात संशयित बॅग; परिसर रिकामा करुन तपासणी

पुणे:पुण्यातील १५ ऑगस्ट चौक परिसरात शुक्रवारी (२७ नोव्हेंबर) संशयित बॅग आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसर मोकळा करण्यात आला असून बॉम्बशोधक पथकाकडून बॅगेची तपासणी सुरू करण्यात आली आहे.

शहरातील १५ ऑगस्ट चौकात बेवारस बॅग दिसून आल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने सुरक्षा व्यवस्था केली. बॉम्बशोधक पथक घटनास्थळी दाखल झाले असून बॅगेमध्ये नेमके काय आहे, याची तपासणी केली जात आहे. दरम्यान, बॅगेत कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा स्फोटक आहे का, हे तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे. या घटनेबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

पाणीटंचाईच्या उपाययोजनांत हलगर्जीपणा खपवून घेणार नाही-आ.भीमराव केराम

माहूर तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईचा आढावा;६२ ग्रामपंचायतींचे नियोजन

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती डिसेंबरअखेरपर्यंत कायम राहण्याची शक्यता लक्षात घेता, आगामी काळात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन करण्याच्या दृष्टीने शुक्रवार, दि.२७ नोव्हेंबर रोजी आ.भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती येथील कै.वसंतराव नाईक सभागृहात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत आ.केराम यांनी गावनिहाय प्रस्तावित पाणीटंचाई आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला. जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून अशा दोन टप्प्यांत संभाव्य पाणीटंचाई निवारणाचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने सादर केलेल्या आराखड्याची सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून खातरजमा करून घेताना प्रत्यक्ष गावातील परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजना प्रस्तावित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागू नये, ही शासन आणि प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे पाणीटंचाईचा आराखडा केवळ कागदोपत्री न राहता तो वास्तव परिस्थितीवर आधारित असावा. नियोजनात कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा अथवा चुकीची माहिती आढळल्यास संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा सूचक इशाराही आमदार केराम यांनी यावेळी दिला.माहूर तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या ११४ महसुली गावांमध्ये संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर इंधन विहिरी, विहिरींचे अधिग्रहण, पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती, आडवे बोअर आदी उपाययोजनांचे नियोजन करण्यात येत आहे. परिस्थितीनुसार या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. याशिवाय ज्या गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र विद्युत रोहित्राची आवश्यकता आहे, अशा ग्रामपंचायतींनी केलेल्या मागणीवर आ.भीमराव केराम यांनी सकारात्मक भूमिका दर्शविली. संभाव्य पाणीटंचाईचे संकट गडद होण्यापूर्वीच उपाययोजनांची अंमलबजावणी व्हावी, पाणीपुरवठा योजनांमधील तांत्रिक अडचणी दूर व्हाव्यात आणि प्रत्येक गावाला आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

नांदेडमध्ये ऑनलाइन खत विक्रीला शेतकऱ्यांचा प्रतिसाद

३५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी केली खताची बुकिंग

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात दि.२२ ऑक्टोबर २०२६ पासून फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल (एफएफएस) या भ्रमणध्वनी आधारित अनुप्रयोगाद्वारे ऑनलाइन खत खरेदी-विक्री सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईलद्वारे खताचे आरक्षण करता येत असून, रब्बी हंगामात गेल्या महिनाभरात ३५ हजार ४५३ शेतकऱ्यांनी ४२ हजार ३५ हेक्टर क्षेत्रासाठी १० हजार ८४५ मेट्रिक टन खताचे आरक्षण केले आहे. त्यापैकी ९ हजार १३१ मेट्रिक टन खताची प्रत्यक्ष विक्री झाली आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यात दररोज सरासरी १ हजार ५०० शेतकरी खताचे आरक्षण करीत असून, सुमारे ४३० मेट्रिक टन खताचे दररोज आरक्षण होत आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना आवश्यक खत, कृषी सेवा केंद्रांवरील उपलब्ध खत साठ्याची माहिती मिळते. खत खरेदीची पारदर्शक नोंद राहते, गरजेपेक्षा जास्त खरेदीला आळा बसतो आणि वेळेवर खत उपलब्ध होण्यास मदत होते. तसेच कृत्रिम खत टंचाई, साठेबाजी, जादा दराने विक्री आणि खताचा अकृषक वापर रोखण्यास या प्रणालीची मदत होत आहे.ऑनलाइन खत खरेदी प्रणालीच्या प्रारंभी काही शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असला, तरी दीर्घकालीन दृष्टीने पारदर्शक खत विक्री व्यवस्था विकसित होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षातील गुणनियंत्रण अधिकाऱ्यांना ऑनलाइन खत खरेदी-विक्री प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले असून, किरकोळ खत विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रधारकांनाही प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रणाली अधिक सुलभ करण्यासाठी आणि तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी अनुप्रयोगात वेळोवेळी आवश्यक सुधारणा करण्यात येत आहेत.शेतकऱ्यांनी ऑनलाइन आरक्षित केलेले खत प्रत्यक्ष कृषी सेवा केंद्रांवर उपलब्ध राहावे, यासाठी **पान ४ वर**

न्याव्यवस्थेतील प्रतिनिधित्वावर माजी न्या.गवईंचा सवाल

नवी दिल्ली:सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नियुक्त्या व बदल्यांमध्ये सामाजिक प्रतिनिधित्व आणि पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून न्यायव्यवस्थेतील नियुक्ती प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी केली आहे. या पत्राच्या प्रती पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कायदामंत्र्यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.दरम्यान, संविधानाच्या **पान ४ वर**

प्रशांत राठोड मित्रमंडळ जि.प.व पंचायत समिती निवडणूक लढविण्याच्या तयारीत

परिवर्तनवादी नागरिक मित्रमंडळाला थारा देत नसल्याचा इतिहास

बी.एल.कागणे

किनवट-तब्बल पस्तीस वर्षाच्या अथक सामाजिक कार्यातून निर्माण झालेला जनसंपर्क आणि त्यातून समर्थकांचे व्यापक जाळे त्या भरोशावरच 'प्रशांत राठोड' मित्रमंडळ येत्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभावशाली राजकीय समिकरण निर्माण करु पहात असल्याचे नव्यानेच भाकितकारांनी भाकीत केले आहे. परंतु किनवट विधानसभा मतदारसंघातील परिवर्तनवादी सुजाण मतदारांनी अशा अनेक मित्रमंडळाचा कोणत्याही निवडणुकीत अद्यापपर्यंत उदय होऊ दिलेला नाही.

मुंबईहून आलेल्या डॉ. अशोक पाटील सुर्यवंशी, धरमसिंग राठोड, यादव जाधव यांना समिकरण बदलता आले नाही. तेव्हा पस्तीस वर्षाचा सामाजिक कार्याचा वसा असल्याची बतावणी करून निवडणूक रिंगणात उतरु पहाणारे प्रशांत राठोड आणि त्यांचे मित्रमंडळ किनवट विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरण बदलतील असे भाकित करणे राजकीय जाणकारांना हजम होणारी बाब



नसल्याचे बोलल्या जात आहे. अनेक वर्षांपासून किनवट विधानसभा मतदारसंघावर जिल्हा परिषद, पंचायत समितीसह कृषी उत्पन्न बाजार समिती असेल अथवा नगरपरिषद, नगरपंचायतीवर माजी आ.स्व.प्रदीप नाईकांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा वरचष्मा होता. स्व. नाईकांच्या पश्चात ही येणारी जिल्हा परिषदेची पहिली निवडणूक आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा गड कायम राखू शकणार की, भाजपा महायुतीच्या पारड्याकडे परिवर्तनवादी मतदार कौल देणार? ते लवकरच पहायला मिळणार आहे. अशा बलाढ्य शक्तीशाली राष्ट्रीय पक्षांच्या त्सुनामीपुढे मित्रमंडळाचा दिवा कसा टिकणार? हे साधे आणि सरळ डोळस चित्र आहे. प्रशांत राठोड यांच्या मित्रमंडळाला सामाजिक कार्याचा तब्बल पस्तीस वर्षाच्या इतिहास असल्याचे राजकारणातील गाढे अभ्यासकांचे म्हणणे आहे. सचिन नाईक मित्र मंडळाने तर विधानसभा निवडणुकी पर्यंत मजल मारली होती. त्यांना दारुण पराभवाला सामोरे गेल्याचा एक इतिहास साक्ष आहे. असे एक ना अनेक मित्र मंडळं आली आणि गेली सुद्धा. तेव्हा प्रशांत राठोड मित्रमंडळाचा कुठे लावणार? याबद्दलच्या तर्कवितर्काने मतदार संघ ढवळून निघतांना दिसतोय. 'प्रशांत राठोड' मित्रमंडळ आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत **पान ४ वर**

नरसी फाट्यावर गुटखा विक्रीला ऊत;बंदीतही सर्रास विक्री सुरु

नायगाव/प्रतिनिधी-शासनाने गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी घातलेली असतानाही नरसीफाटा परिसरात गुटखा विक्रीला मोठ्या प्रमाणात चालना मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिसरातील काही पानटपऱ्यांवरून गुटख्याची विक्री होत असल्याच्या चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहेत.

विशेष म्हणजे, नरसीफाटा येथून आजूबाजूच्या २५ ते ३० गावांमध्ये दररोज गुटख्याचा पुरवठा होत असल्याची माहिती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नरसीफाटा परिसरात गुटख्याच्या अवैध व्यवसायाचे मोठे जाळे कार्यरत असल्याचा संशय व्यक्त होत असून, या व्यवसायाची व्याप्ती नेमकी किती आहे, याची चौकशी होणे गरजेचे आहे.गुटख्याच्या वाढत्या विक्रीमुळे विशेषतः तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शासनाने बंदी घातलेली असतानाही अशा पदार्थांची विक्री सुरू असेल, तर या बंदीचा नेमका उपयोग काय, असा सवाल उपस्थित होत आहे. गुटखा विक्रीचे जाळे नेमके कुठून **पान ४ वर**

राजकीय डावपेचांना वेग!

भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये संसद ही केवळ कायदे करण्याची संस्था नसून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील वैचारिक संघर्षाचे, लोकहिताच्या प्रश्नांवरील चर्चेचे आणि देशाच्या भविष्याची दिशा ठरविण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. मात्र, अलीकडच्या काळात संसदेचे कामकाज लोकहितापेक्षा राजकीय प्रतिष्ठा आणि सत्तेच्या गणिताभोवती अधिक फिरताना दिसत आहे. संसदेचे अर्धवट राहिलेले पावसाळी अधिवेशन पुन्हा ३० नोव्हेंबरपासून सुरू करण्यासाठी केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी लोकसभा आणि राज्यसभेच्या अध्यक्षांना पत्र पाठविल्याने राजकीय घडामोडींना पुन्हा वेग आला आहे. या अधिवेशनाच्या पुनरारंभामागे केवळ संसदीय कामकाज पूर्ण करण्याचा उद्देश आहे की, काही महत्त्वाची राजकीय समीकरणे जुळविण्याचा प्रयत्न आहे, याची चर्चा आता सुरू झाली आहे.यापूर्वी विविध कारणांमुळे हिवाळी अधिवेशनाचे कामकाज अर्धवट राहिले होते. नीटसह विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, त्यातून उभे राहिलेले आंदोलन, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न तसेच दिल्लीतील तणावपूर्ण परिस्थिती यामुळे संसदेचे कामकाज अपेक्षित पद्धतीने होऊ शकले नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारला उत्तर द्यावे लागणे अपेक्षित असताना या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर अधिवेशन स्थगित ठेवण्याची वेळ आली. मात्र, संसदेचे कामकाज स्थगित झाले म्हणून प्रश्न संपत नाहीत. उलट अशा परिस्थितीत संसदेच्या व्यासपीठावरून चर्चा होणे अधिक आवश्यक असते.या अधिवेशनात केंद्र सरकारने मोठ्या अपेक्षेने आणलेली महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना ही दोन्ही विधेयके सभागृहात आवश्यक बहुमताअभावी मंजूर होऊ शकली नाहीत. महिला आरक्षण हा देशातील महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाशी संबंधित महत्त्वाचा विषय आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना प्रतिनिधित्वाची संधी मिळावी, ही मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र, महिला आरक्षणाची अंमलबजावणी, मतदारसंघांची पुनर्रचना आणि लोकसभेतील जागांची संभाव्य वाढ या मुद्द्यांचा एकमेकांशी असलेला संबंध लक्षात घेतला तर या विधेयकांकडे केवळ महिलांच्या प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने पाहून चालणार नाही. त्यामागील राजकीय आणि घटनात्मक परिणामांचाही विचार करावा लागेल.विशेषतः मतदारसंघ पुनर्रचनेचा विषय अत्यंत संवेदनशील आहे. देशातील विविध राज्यांची लोकसंख्या, त्यानुसार मिळणारे प्रतिनिधित्व आणि संघराज्य व्यवस्थेतील समतोल या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. दक्षिण भारतातील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा त्यांच्या संसदीय प्रतिनिधित्वावर विपरीत परिणाम होणार नाही, याची हमी मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे या विषयावर सर्वपक्षीय चर्चा आणि व्यापक सहमती आवश्यक आहे. केवळ बहुमताच्या जोरावर निर्णय घेण्यापेक्षा सर्व घटकांचा विश्वास संपादन करणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खा.सुप्रिया सुळे यांनी मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयक देशहिताचे असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस त्याला पाठिंबा देण्यास तयार असल्याचे विधान केले आहे. या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. कारण यापूर्वीच्या अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेसने महिला आरक्षण विधेयक आधीच मंजूर झाले असताना त्याच्या अंमलबजावणीसाठी २०२९ पर्यंत प्रतीक्षा का करावी, असा प्रश्न उपस्थित केला होता. आता त्याच पक्षाकडून विधेयकांना पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली जात असल्याने या भूमिकेमागील राजकीय भूमिका काय?, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.सत्ताधारी भाजपकडून विरोधी पक्षांमधील मतभेदांचा फायदा घेऊन आवश्यक संख्याबळ उभे करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे. विरोधकांमध्ये एकजूट राहिली नाही तर सरकारला महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेणे सोपे जाऊ शकते. त्यामुळे विरोधी पक्षांनी केवळ सरकारला विरोध करण्यासाठी विरोध न करता विधेयकातील तरतुदींचा अभ्यास करून आपली भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे. त्याचवेळी सत्ताधाऱ्यांनीही विरोधकांच्या प्रश्नांना राजकीय अडथळा समजण्याऐवजी त्यांना विश्वासात घेण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे.संसदेचे अधिवेशन पुन्हा सुरू होणे ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र, त्यातून केवळ विधेयके मंजूर करून घेण्याची घाई दिसता कामा नये. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान, बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि देशातील कायदा व सुव्यवस्था या विषयांवरही गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना यांसारखे दूरगामी परिणाम करणारे निर्णय सर्वसमावेशक चर्चेतूनच व्हायला हवेत. कारण संसद ही सत्ताधाऱ्यांच्या संख्याबळाची परीक्षा घेण्याची जागा नसून जनतेच्या विश्वासाचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. राजकीय डावपेचांच्या खेळात लोकशाहीचा मूळ हेतू हरवू नये, एवढीच अपेक्षा!

आपण बिघडलो की सुधारलो?, तेच कळत नाही

देश महासत्ता बनत चाललाय. देशाच्या सर्वच क्षेत्राचा विकास झाला आणि होत आहे. आपण पाश्चात्यांचं अनुकरण करीत आहोत. असं वाटतं. ते जसे वागतात, तसेच आपण वागायला लागलोय, आपली संस्कृती महान असतांना. एवढंच नाही तर आपण त्यांच्याच संस्कृतीला महानही समजायला लागलोय. यावरुन आफण बिघडलो की सुधारलो. तेच कळत नाही.नवीन शैक्षणिक धोरण. दुसऱ्या शैक्षणिक धोरणाच्या तब्बल चौतीस वर्षानंतर आलेलं धोरण. बऱ्याच प्रमाणात सुधारणा होवून आलेलं धोरण आणि हे कॉन्व्हेंटच्या धोरणावर आधारीत वाटतं.



कॉन्व्हेंटचं धोरण हे इंग्रजी राजवटीचं व पाश्चात्य विचारसरणीनं नटलेलं धोरण आहे. त्याचा फटका येथील प्राचीन काळात असलेल्या भारतीय धोरणावर पडलेलं आहे. भारताला माहित आहे की भारतीय ज्ञानरचना आणि येथील इतिहास समृद्ध आहे. शिवाय शैक्षणिक बाबींचाही विचार केला तर भारतात अठरा विश्वविद्यालये होती. शिवाय ती प्रगत व तेवढीच समृद्धही होती. परंतु त्या विश्वविद्यालयांना नष्ट करण्यात आलं. नालंदा विश्वविद्यालयाला आग लावण्यात आली. त्यानंतर नवीन शैक्षणिक धोरणे बनविण्यात आली व त्या शैक्षणिक धोरणानुसार त्यांची शिक्षणाची माध्यमे ठरविण्यात आली. सामान्यांवर अन्याय करुन सामान्यांना शिक्षणापासून वंचीत करण्यात आलं.सध्या कॉन्व्हेंट शाळा अस्तित्वात आल्या. त्यांना सहमती सरकारनच दिली. त्याचं कारण होतं, आपल्यावरील जबाबदारी झटकणं. ती जबाबदारी झटकली गेली. त्याची दोन कारणं होती. पहिलं कारण म्हणजे सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे अगदी लहान लहान बाबींसाठी आंदोलन करणं व दुसरं कारण होतं, वेतन. सरकारी खर्मचाऱ्यांचे वेतन एवढे वाढलेले आहे की ते द्यायला सरकारच्या नाकीनव येतं. तसं कॉन्व्हेंटचं नाही. कॉन्व्हेंटचे कर्मचारी सरकार विरोधात कोणत्याही स्वरुपाचे आंदोलन करु शकत नाहीत आणि त्यांना देण्यात येणारं वेतन हे सरकारी तिजोरीतून जात नाही. म्हणूनच कॉन्व्हेंटला परवानगी. परंतु त्याचा परिणाम हा झाला की लोकांनी आपली मुलं कॉन्व्हेंटलाच नेवून टाकली. जरी तिकडे शिक्षणासाठी पैसे मोजावे लागत असले तरी आणि जरी तिकडे शिकवायला पाहिजे तेवढा प्रशिक्षित वर्ग नसला तरी. मात्र या कॉन्व्हेंट धोरणाचा व शाळेचा फटका सरकारी शाळांना भेडसावत आहे. सरकारी शाळेत विद्यार्थीच दिसत नाहीत.

काही शाळा बंदल होत आहेत तर काही शाळेत जेमतेम दोनचारच विद्यार्थी आहेत. हीच बाब हेरुन गरीबांची मुलं शिकतील कुठं? हा प्रश्न सरकारसमोर उभा राहिला. मग सरकारनं त्यासाठी पाऊल उचलण्यास सुरुवात केली व नवीन शैक्षणिक धोरण आणलं. नवीन आकृतीबंध ठरवला. पाच अधिक तीन अधिक तीन अधिक चार. ज्यात नर्सरी केजी वन व केजी टू च्या धर्तीवर बालवाटिका एक, दोन तीन आणलं. त्याला पहिला व दुसरा वर्ग जोडला. मग साऱ्याच गोष्टींवर भर टाकण्यात आला. या नवीन शैक्षणिक धोरणानुसार पायाभूत साक्षरता, संख्याज्ञान, व्यवसाय शिक्षण, विविध भाषा व तंत्रज्ञान यावर भर देण्यात आला. अपेक्षीत त्रिसुत्री कार्यक्रम हातात घेण्यात आला. सर्व मुलं शाळेच्या प्रवाहात आणणे, त्यांना टिकविणे व त्यांना दर्जेदार शिक्षण देणे. त्यासाठी सतरा लक्ष्ये ठरविण्यात आली. जी जगानं स्विकारली होती. त्यात दरिद्रता निर्मूलन, भूक निर्मुलन, चांगले आरोग्य, शाश्वत शेती, दर्जेदार शिक्षण, लैंगिक समानता, शुद्ध पाणी व स्वच्छता, स्वस्त उर्जा, चांगल्या नोकऱ्या, पायाभूत सुविधा, असमानता कमी करणे, शाश्वत शहरे व वसाहत विकास, हवामान बदल उपाययोजना, शाश्वत महासागर, जमिनीचा शाश्वत उपयोग, जंगलतोड, शांतता व न्याय, शाश्वत विकासात भागीदारी. यांचा समावेश जगानं आपल्या धोरणात केला होता. तीच लक्ष्ये भारतानंही स्विकारली. कारण भारतातील गरीबी मिटायला हवी. गरीब नाही. भूक निर्मुलन, भारतातील कुपोषितपणानं मरणाऱ्या बालकांचे प्रमाण कमी करणे. यासाठी सरकारनं खिचडी दिली. चांगले आरोग्य, यासाठी सरकारनं वारंवार आरोग्य तपासणी करण्याची व्यवस्था सरकारनं शाळेत केली.

शाश्वत शेती, याद्वारे किसान सुखी तर जग सुखी ही योजना राबविण्यात येते. शेतकऱ्यांना युरीया पुरविण्यात येते. तसेच दुष्काळी मदत म्हणून पैसेही पुरविण्यात येतात. शुद्ध पाणी, यालाही लक्ष्यात समाविष्ट केल्या गेले आहे. शुद्ध पाणी जर असेल तर आरोग्यदेखील चांगले राहिल. याचाच विचार करुन सरकारनं शुद्ध पाण्याच्या मशीना प्रत्येक शाळेत लावाव्यात. अशी व्यवस्था केली. यानंतर दर्जेदार शिक्षणावरही भर दिल्या गेला. लैंगिक समानता व शहरं विकासावर भर देण्यात आला. महासागर वाचविण्याच्या गोष्टी होवू लागल्या. शांतता प्रस्थापित करण्यासाठी पावलं उचलली गेली. प्रदुषणावर मात करण्याचे प्रयत्न सुरु झाले. प्लॅस्टिक जाळू नये. जुनी वाहनं चालवू नये. यावर भर देण्यात आला. स्वस्त उर्जेसाठी सौर प्रणाली राबविण्यात आली. जंगलतोडीवर रोख लावण्यात आली. भेदभाव कमी करण्याचे प्रयत्न सुरु झाले. जमीनीचा पोत सुधारण्याचे प्रयत्न सुरु झाले. जमीनीचा पोत सुधारावा, यासाठी शेतात युरीया टाकण्याऐवजी कॅम्पोस्ट खत वापरावे याची जाहिरात करण्यात आली.ही जी सतरा लक्ष्ये आहेत. याला गोल्स म्हणतात. सन १९९२ ला जगात पृथ्वी संमेलन झालं व हू पृथ्वी संमेलन ब्राझीलमध्ये रियो डी जानेरो शहरात झालं. त्या पृथ्वी संमेलनातच या सतरा लक्ष्यावर विचार केल्या गेला. तीच लक्ष्य भारतानंही स्विकारलीत. परंतु त्याचा काही ठिकाणी भारतीय लोकँ गैरफायदा घेतांना दिसतात. जसे भूक निर्मुलन या संकल्पनेतून सरकारनं शाळेत खिचडी वाटप व्यवस्था केली. परंतु ज्या बचतगटातून खिचडी येते. ती तेवढी उत्कृष्ट वाटत नाही. शाळा जरी खिचडी बनवीत असेल तरी ती व्यवस्थित राहात नाही. अधिकारी वर्गांना विश्वासात घेवून सगळा गोंधळ सुरु आहे. हे असं का? याचं कारण या माध्यमातून पैसा कमविणे, हा उद्देश आहे. मग कुठून कुपोषीतपणा कमी होईल? काही आदिवासी भागात ही व्यवस्था असली तरीही कुपोषितपणा सुरुच आहे.

एवढंच नाही तर बऱ्याच शाळेत का वॉटर मशीन लागलेल्या आहेत. परंतु त्या नाममात्र आहेत. त्यामधील पाण्याचा वापर केल्या जात नाही. दारिद्रता निर्मुलन या मुद्याअंतर्गत दारिद्रता निर्मुलन केलं जात नाही तर गरीबांनाच मारणू सुरु आहे. शाश्वत शेती योजनेंतर्गत जेवढा युरीया वाटपासाठी येतो. तेवढा पुरवठा होत नाही. लैंगिक समानता देखील नाही. बऱ्याच ठिकाणी स्त्री पुरुष असमानता आजही पाहायला मिळते. अन् शाश्वत शहरे व वसाहत विकास यामध्ये शहराच्या सुशोभीकरणाचा भाग येतो. परंतु बरीच शहरं सुशोभित नाहीत. काही ठिकाणी जागोजागी कचऱ्याचे ढीगच निदर्शनास येतात. जंगलतोड या मुल्याअंतर्खत शहरांच्या विकासासाठी झाडं तोडली. परंतु ती तोडलेली झाडं लावल्या गेली नाहीत. शाश्वत महासागर या संकल्पनेत महासागर वाचविण्याचे प्रयत्न होत नाहीत तर ज्या नद्या महासागराला मिळतात. त्याच नद्यांमध्ये कारखान्यातून निघणारा विषारी सांडपाणी मिसळवला जातो. येथील नागरीकांना शुद्ध पाणीही व्यवस्थित मिळत नाही. हवामान बदलाचा भाग जर पाहिला तर ध्वनीप्रदूषण, वायूप्रदुषण, अन्नप्रदुषण हे ठरलेलं आहे. डीजेचा व वाहनांचा कर्णकर्कश आवाज उठल्यापासून ऐकायला येतो. प्लॅस्टिक व कारखान्यातून निघणारा विषारी धूळ वातावरणातील हवेचं प्रदुषण करते तर अन्नधान्य देखील आपल्याला भेसळयुक्तच खायला मिळत आहे. एवढंच नाही तर दर्जेदार शिक्षणाची भाषा करीत असतांना शाळेतही विद्यार्थ्यांना खेळखंडोबाच दिसतो. कॉन्व्हेंट धोरण व विविध भाषा विकास राबवितांना राबवितांना आमची मुलं अनेक भाषा तर सोडाच, धड कोणतीही एक भाषा नीट बोलत नाही. स्वस्त उर्जा अंतर्गत दिवसा सौर उर्जा निःशुल्क व रात्री शुल्क, यात श्रीमंत कारखानदाराचा फायदा दिसतो.

गरीबांचा फायदा दिसत नाही. राहिला मुद्दा बेरोजगारीचा. तर चांगल्या नोकऱ्या या समाप्त झालेल्या आहेत व त्याजागी केवळ हमाल म्हणून उच्चशिक्षीतांनाही राबावे लागत आहे. ज्यात कितीतरी तास काम व अल्प वेतनातून कामगारांचे शोषण होत आहे.महत्वाचं सांगायचं झाल्यास गरीब आणखी गरीब होत आहे व श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहे. शिक्षणाच्या बाबतीत विचार केल्यास कालचं जसं शिक्षण चांगलं होतं, त्याचा जसा दर्जा चांगला होता. तसा दर्जा आज दिसत नाही. कालच्या शिक्षणानं गरीबांची मुलंही शिकली व अधिकारी बनली. आज तसं नाही. आजच्या शिक्षणानं श्रीमंतांची मुलं अधिकारी बनतील आणि गरीबांची मुलं हातमजूर अशी स्थिती निर्माण झालेली आहे.विशेष म्हणजे आमचा भारत काल समृद्ध असतांना आज अशी अवस्था का? यावर प्रश्नचिन्हं लागतं. आम्ही पाश्चात्यिकरणाच्या अनुकरणानं सुधारलो की बिघडलो ते कळायला मार्ग नाही. आमचा शाश्वत विकास होत आहे की नाही, हे कळत नाही. खरंच आज आम्ही एवढेही लाचार बनू नये की आमच्या देशातील गरीब संपेल. बालकांचे कुपोषण होईल. देशात प्रदुषण होईल आणि आमचा देश अधोगतीला जाईल. आमचा देश सुधरावा असं वाटत असेल तर आम्ही आमचा स्वार्थ सोडावा व आवश्यक बदल आमच्यातच करावेत. जेणेकरुन आम्ही सुधरु व आमचा देशही तेवढाच सुधरेल. यात शंका नाही. तसेच आम्ही सुधारलो की बिघडलो. ही शंका आपली आपल्यालाच निर्माण होणार नाही. हे तेवढंच खरं.

अंकुश शिंगाडे
नागपूर

स्त्रीभ्रूणहत्या व सुरक्षेवर भाष्य करणारे 'गर्भ' नाटक ठरले लक्षवेधी



धर्माबाद/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचलनालय आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत दि. २१ नोव्हेंबर रोजी डॉ. शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृहात सादर झालेल्या 'गर्भ' नाटकाने प्रेक्षकांना अंतर्मुख केले. सप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड निर्मित या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन दिनेश कावडे यांनी केले आहे.

स्त्रीभ्रूणहत्या, महिलांची सुरक्षा आणि समाजातील असमानता या संवेदनशील विषयांवर भाष्य करणाऱ्या या नाटकात आईची भूमिका साकारणाऱ्या धर्माबाद येथील कु. सपना गणेश वाघमारे हिच्या कसदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. यापूर्वी 'नेकी' नाटकातून प्रथम पारितोषिक मिळवलेल्या सपनासोबतच जन्म घेणाऱ्या मुलीच्या भूमिकेतील कु. आराध्या पांचाळ हिच्या भावपूर्ण सादरीकरणाने अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. अर्भक दफन करताना पुरुष छत्रीखाली आणि महिला पावसात उभ्या असल्याचे दृश्य स्त्री-पुरुष असमानतेचे विदारक वास्तव मांडते. नाटकातील कलाकारांच्या प्रभावी अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत असून 'गर्भ'ला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळावे, अशी भावना व्यक्त होत आहे.

नायगाव उपकोषागार कार्यालयात देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान

नायगाव/प्रतिनिधी-केंद्र शासनाच्या कार्मिक, लोकशिकायत तथा पेन्शन मंत्रालयाच्या पेन्शन एवं पेन्शनभोगी कल्याण विभाग तसेच महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या माध्यमातून देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान ५ राबविण्यात येत आहे.

१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत नायगाव येथील उपकोषागार कार्यालयाच्या माध्यमातून पेन्शनधारकांमध्ये जनजागृती केली जात आहे.या अभियानाचा मुख्य उद्देश चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे हा आहे. डिजिटल इंडिया आणि जीवन प्रमाण या उपक्रमांच्या माध्यमातून पेन्शनधारकांना डिजिटल पद्धतीने जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.विशेष म्हणजे, स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये या अभियानासाठी स्वतंत्र टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल जीवन प्रमाणपत्र प्रक्रियेबाबत मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. याबाबतची माहिती नायगावचे उपकोषागार अधिकारी श्री. लिंगानंद श्रीराम भुरे यांनी दिली.यावेळी उपकोषागार अधिकारी लिंगानंद श्रीराम भुरे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक अविनाश मार्बल तसेच निवृत्तीवेतनधारक श्री. वसंत शंकर माने यांची उपस्थिती होती.डिजिटल जीवन प्रमाणपत्राच्या सुविधेमुळे पेन्शनधारकांना जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त निवृत्तीवेतनधारकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करण्याचे आ.बोंढारकर यांचे प्रशासनाला निर्देश



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागू नये, यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे स्पष्ट निर्देश आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी प्रशासनाला दिले.

नांदेड उपविभागीय कार्यालय येथे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड दक्षिण तालुक्यातील पाणीटंचाईच्या प्रश्नासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, विविध गावांतील पाणीपुरवठ्याच्या अडचणी, नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच शेतकरी बांधवांच्या पाण्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीमध्ये विशेषतः वीजपुरवठ्याच्या प्रश्नावरही सविस्तर चर्चा झाली. पाणीपुरवठा योजनांचे सुरळीत कामकाज आणि पाणी उपलब्धतेसाठी नियमित वीजपुरवठा महत्त्वाचा असल्याने वीज वितरणाशी संबंधित अडचणी तातडीने दूर करण्याची आवश्यकता यावेळी व्यक्त करण्यात आली. वीज पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना देण्यात आल्या. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि गावातील जनावरांच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करणे, पाणी पुरवठ्याच्या योजनांची कार्यक्षमता तपासणे आणि तक्रारींचे तातडीने निराकरण करणे यावर आ.बोंढारकर यांनी भर दिला. तसेच शेतकऱ्यांच्या पाण्याशी संबंधित प्रश्नांकडेही प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. उपाय योजनांच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही आ.बोंढारकर यांनी यावेळी दिला. नांदेड दक्षिण मतदारसंघातील नागरिकांना पाणीटंचाईचा त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनासोबत सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल. पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी स्पष्ट केले.यावेळी उपस्थित उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्ळाळ,तहसीलदार संजय वारकड,गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर,कृषी अधिकारी संजय चातूरमाल, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,युवासेना जिल्हाप्रमुख बाळु पाटील मोरे, नरेंद्र गायकवाड, बालाजी पाटील भायेगावकर, श्याम पाटील वानखेडे,रहेमान खान,सुरेश जाधव यांच्यासह सर्व माजी सरपंच, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक आणि प्रशासक अधिकारी उपस्थित होते.

युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांची अनिताताई चोंडीकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



नायगाव/प्रतिनिधी-भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज धनंजय महाडिक यांनी शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी नरसी येथे भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रा.अनिताताई चोंडीकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

नरसी येथे आगमन झाल्यानंतर प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी येथील प्रसिद्ध भगवान बालाजी मंदिरात दर्शन घेऊन आरती केली. त्यानंतर भाजपचे जिल्हा सरचिटणीस माणिकराव लोहगावे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यानंतर त्यांनी प्रा. अनिताताई चोंडीकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी अनिताताई चोंडीकर यांनी प्रदेशाध्यक्ष महाडिक यांचे स्वागत केले. या प्रसंगी डॉ. माधवराव पाटील उचेकर, माणिक लोहगावे, लक्ष्मणराव ठक्करवाड, उमाकांत गोपछडे, चंद्रशेखर पाटील, हावगीराव गोपछडे, संदीप पाटील रामपुरे, कु. श्रुती तुडमे, कु. भावना दाशेटवार, संगीता जाधव, भगवान पाटील कानोले, गणेश कंदुरके व इतर उपस्थित होते.

कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने संविधान दिन साजरा

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय संविधान दिनानिमित्त कॉक्रोच जनता पार्टी नांदेड यांच्यावतीने महात्मा फुले पुतळा आयटीआय कॉर्नर, नांदेड येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाचे प्रास्ताविक वाचन झाले आणि संविधानाचे महत्त्व, संविधानिक मूल्ये, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यावर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रम केवळ संविधान दिन साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, संविधानाने दिलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या आधारे समाजातील विविध प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी (सीजेपी) संघटना नांदेड जिल्ह्यात अधिक मजबूत करण्यासाठी चर्चा करण्यात आली. यावेळी प्रदेश समन्वय समिती सदस्य क्रांती भाटापुरकर, आशिष दुधमाल, तेजस्विनी कांबळे, जगदीश गीते, संदीप गायकवाड, निरंजन मुंगल आदी तसेच कॉक्रोच जनता पार्टीचे जिल्ह्यातील पदाधिकारी व समन्वयक उपस्थित होते.

प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते मारतळा ते कौडगाव ५ कोटींच्या रस्ता कामाचे भूमिपूजन



नांदेड/प्रतिनिधी-लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या मारतळा ते कौडगाव या रस्त्याच्या ५ कोटी रुपये निधीच्या कामाचा भूमिपूजन सोहळा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या शुभहस्ते मौजे कौडगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी गावातील ग्रामस्थांनी प्रवीण पाटील चिखलीकर यांचा सन्मान करून त्यांचे स्वागत केले. ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांनी लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघात आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून विविध विकासकामे वेगाने सुरू असल्याचे सांगितले.लोहा-कंधार मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी आगामी काळातही अनेक महत्त्वपूर्ण कामे हाती घेण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर कायम प्रयत्नशील आणि कटिबद्ध आहेत. विकासकामांचा हा वेग यापुढेही असाच कायम राहील आणि मतदारसंघाचा सर्वांगीण कायापालट करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू, असा विश्वास प्रवीण पाटील चिखलीकर यांनी यावेळी व्यक्त केला.या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी माजी सभापती बालाजीराव पा. मारळेकर, उपसभापती रोहित पाटील, मा. जि.प. सदस्य सुभाष बास्टे, विस्ताराधिकारी एस. एन. मांजरमकर, उपअभियंता सुमित पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष गोपीनाथ पाटील, अशोकराव जाधव, भगवान बेटकर, केशवराव ढेपे, गणेशराव क्षीरसागर, संभाजीराव पाटील, गणेशराव उबाळे, प्रल्हादराव जाधव, बाबुराव कपाळे, ज्ञानेश्वर उबाळे, बालाजीराव डोनवाडेकर, गुणाजी पाटील, श्रीकांत जाधव, आनंदराव मेथे, सरपंच बाळू पाटील, चेअरमन केशव पाटील, भीमराव पाटील, बालाजी पाटील बरकडे, माधवराव पाटील भरकडे, वैभव हातणे, नागोराव दर्शने, परसराम हातणे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कौडगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या रस्त्याच्या कामामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होऊन नागरिक, शेतकरी आणि वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

रस्ते खड्ड्यात,गावं तहानलेली...अन् एसटीला मात्र नवीन इमारतीची घाई

उमरखेड/प्रतिनिधी-दुष्काळाचं गडद सावट, पाण्यासाठी वणवण आणि खड्डेमय रस्त्यांवर जीव मुठीत धरून प्रवास अशी विदारक अवस्था असताना उमरखेडकरांना आता एका नव्याच धक्क्याला सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने उमरखेड येथील आजही सुस्थितीत असलेली, भक्कम बसस्थानक इमारत पाडण्याचा निर्णय घेतला आहे. अजून पुढील ५० वर्षे सहज टिकेल, अशी ही वास्तू पाडून नव्याने इमारत बांधण्यामागे नक्की कोणाचा फायदा आहे? असा जळजळीत सवाल आता तालुक्यातील प्रत्येक नागरिक विचारत आहे.



विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, या नव्या इमारतीसाठी किती निधी मंजूर झाला? अंदाजपत्रक किती आहे? याची साधी माहितीही स्थानिक एसटी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नाही. या कमालीच्या गुप्ततेमुळे संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

एकीकडे तालुक्यात अर्धवट रस्त्यांच्या कामांनी विकासाचा बोजवारा उडाला असून, जीवघेण्या खड्ड्यांमुळे मणक्याचे आजार आणि अपघात सतत वाढत आहेत. तर दुसरीकडे जलजीवन मिशनची कामे अर्धवट पडून गावोगावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पेटला आहे. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य सुविधांचाही पूर्ण बोजवारा उडाल्याने रुग्णांची मोठी हेळसांड होत आहे. गंमत म्हणजे, बसस्थानकाची ही ३९ वर्षांपूर्वीची इमारत आजही भक्कम आहे. महामंडळाने देखभालीवर फारसा खर्च केलेलाच नाही. उलट रंगरंगोटी, प्लॅटफॉर्म बोर्डची दुरुस्ती ही कामे येथे जाहिरात फलक लावणारे स्थानिक दुकानदार स्वतःच्या खिशातून करत आले आहेत.अशी सुस्थितीतील वास्तू पाडण्याऐवजी बसस्थानकाच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या सुमारे १ हजार फूट लांबीच्या मोकळ्या जागेवर भव्य व्यापारी संकुल उभारता येईल, असा उत्तम पर्याय उपलब्ध आहे. त्यातून तोट्यातील एसटीला दीर्घकालीन मोठे उत्पन्न मिळेल आणि स्थानिकांना रोजगारही मिळेल. उत्पन्नाचा हा व्यवहार्य मार्ग डावलून सुस्थितीतील इमारत पाडण्याचा अट्टहास का? हे कोडेच नागरिकांना पडले आहे.दुष्काळात तेरावा महिना अशी जनतेची अवस्था असताना, कोणाच्या आर्थिक फायद्यासाठी की, कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी ही गुप्तता पाळून नवीन इमारतीचा घाट घातला जातोय? असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते आणि प्रवासी संघटनांनी उपस्थित केला आहे.एसटी महामंडळ आणि राज्य शासनाने जनभावनेची तातडीने दखल घेऊन इमारत पाडण्याचा निर्णय रद्द करावा आणि त्याऐवजी व्यापारी संकुल उभारून महामंडळाला सक्षम करावे, अशी जोरदार मागणी उमरखेडकरांकडून होत आहे.

निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

मुस्लिम शिक्षकांकडून चहाची व्यवस्था;हिंदू शिक्षकांकडून केळी वाटप

नांदेड/प्रतिनिधी-कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणात हिंदू-मुस्लिम शिक्षकांनी परस्पर सहकार्याचा उपक्रम राबवून धार्मिक सलोख्याचा संदेश दिला. मुस्लिम शिक्षक बांधवांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी चहाची व्यवस्था केली, तर हिंदू शिक्षकांनी सर्वांना केळी वाटप केले. या उपक्रमातून शिक्षकांमधील परस्पर स्नेह, सहकार्य आणि सामाजिक एकात्मता दिसून आली.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या अंतर्गत ऑक्सफर्ड द ग्लोबल इंग्लिश स्कूल येथे २०२६ चे निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण सुरू आहे. प्रशिक्षणादरम्यान कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शिक्षकांनी एकमेकांना शुभेच्छा देत उपक्रमात सहभाग नोंदविला. धार्मिक परंपरा वेगवेगळ्या असल्या तरी परस्पर आदर आणि सहकार्याच्या भावनेतून सामाजिक सलोखा जपता येतो, हे या कृतीतून स्पष्ट झाले.प्रशिक्षणासाठी तीन गटांची रचना करण्यात आली असून, प्रशिक्षण प्रमुख संजय शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे कामकाज सुरू आहे. शैक्षणिक प्रशिक्षणा सोबतच सामाजिक एकोपा आणि सर्वधर्मसमभावाची भावना जपणारा हा उपक्रम प्रशिक्षणार्थी शिक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरला.

तलवार बाळगणाऱ्या इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील मुरमुरा गल्ली भागात तलवार घेवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमास वजिराबाद पोलीसांनी बुधवारी पहाटे अटक केली आहे.

साईनाथ कचरु कांबळे (वय ३२) रा.मुरमुरा गल्ली,नांदेड हा बुधवारी पहाटे हातात तलवार घेवून रस्त्यावर नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत होता. वजिराबाद पोलीसांनी तात्काळ मुरमुरा गल्ली भागात पोहचून साईनाथ कांबळे यास अटक केली. त्याच्या विरुध्द वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाहीर प्रगटन

मा.श्री.प्रसाद एस.ठाकरे,दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नायगाव (बा.) यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज २४१/२०२६
वंदना राक्षसमारे व इतर पाच वि. निरंक
अर्जदार : १. वंदना भ्र.सदाशिव राक्षसमारे वय : ४५ वर्षे, धंदा : घरकाम, २. दुर्गा पि.सदाशिव राक्षसमारे वय : ११ वर्षे, धंदा : शिक्षण, ३. कोमल पि.सदाशिव राक्षसमारे वय : ०९ वर्षे, धंदा : शिक्षण, अ.क्र.२ व ३ अ.पा.क.१, ४. माधव पि.सदाशिव राक्षसमारे वय : ३५ वर्षे, धंदा : मजुरी, ५. कपिल पि.सदाशिव उर्फ शंकर राक्षसमारे वय : ३० वर्षे, धंदा : मजुरी, ६. धम्मपाल पि.सदाशिव उर्फ शंकर राक्षसमारे वय : ३० वर्षे, धंदा : मजुरी सर्व रा.कहाळा खु.ता.नायगाव जि.नांदेड, ७. जयश्री भ्र.श्रीकांत भुरे वय : ३० वर्षे, धंदा : मजुरी रा. अंबानगर सांगवी बु.ता.जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार : निरंक
दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.
या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत सदाशिव पि.केरबा राक्षसमारे यांची अर्जदार क्र.०१ ही पत्नी आहे तसेच अर्जदार क्र.०२ व ०३ ह्या मुली, अर्जदार क्र.४, ५ व ६ ह्या मयताची मुले असुन अर्जदार क्र.७ ही मुलगी आहे. मयत सदाशिव पि.केरबा राक्षसमारे यांचा मृत्यु दि.१०/०३/२०२५ रोजी कहाळा खु.ता.नायगाव येथे झाला आहे. अर्जदाराशिवाय मयतांचे कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत सदाशिव पि.केरबा राक्षसमारे यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.
तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील संबंधिताना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत दिनांक २१/१२/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.
आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
स.अधिक्षक
दि.न्या.,क.स्तर,नायगाव

स्वाक्षरित/-
क.लिपिक
दि.न्या.,क.स्तर,नायगाव

जाहीर प्रगटन

आर.पी.शिंदे,न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,न्यायालय क्र.१,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१७००/२०२६
आदित्य अनिल राठोड वि. आयुक्त
अर्जदार:- आदित्य अनिल राठोड, वय १८ वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा.गोपाळनगर, सांगवी बु.,नांदेड ता.जि.नांदेड
विरुध्द
गैरअर्जदार : आयुक्त जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी,नां.वा.श. महानगरपालिका,नांदेड
जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार आदित्य अनिल राठोड, वय १८ वर्ष, व्यवसाय-शिक्षण, रा.गोपाळनगर, सांगवी बु.,नांदेड ता.जि.नांदेड यांचा स्वतःचा जन्म दिनांक २९.१०.२००७ रोजी राहत्या घरी गोपाळनगर, सांगवी बु.,नांदेड, ता.जि.नांदेड यांचा स्वतःचा जन्म दिनांक २९.१०.२००७ रोजी राहत्या घरी गोपाळनगर, सांवगी बु., नांदेड, ता.जि.नांदेड येथै झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.
तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०६.०१.२०२७ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.
सदरचे जाहिर प्रगटन आज दिनांक २५/११/२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

जाहीर प्रगटन

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१६९८/२०२६
दिनेश वि.निबंधक
अर्जदार : दिनेश धोंडिबा काळे, वय ५२ वर्ष, रा.लक्ष्मी निवास बालाजी नगर तरोडा बु. संकेत हॉस्टेलच्या समोर,नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार : जन्म व मृत्यु निबंधक, नां.वा.श.म.न.पा.
जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार दिनेश धोंडिबा काळे, वय ५२ वर्ष, रा.लक्ष्मी निवास बालाजी नगर तरोडा बु.संकेत हॉस्टेलच्या समोर,नांदेड यांचा जन्म दिनांक १३/०८/१९७४ रोजी त्यांच्या राहत्या घरी झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.
तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १२/०१/२०२७ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.
सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक २२-११-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

जाहीर प्रगटन

६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१६९९/२०२६
नोटीस
अर्जदार : नागेश पि.गुलाबसिंग ठाकुर,वय २४ वर्षे, रा.जयभवानी नगर सांगवी बु. नांदेड ता.जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार : मा.जन्म व मृत्यु निबंधक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ता.जि.नांदेड
जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार नागेश पि.गुलाबसिंग ठाकुर वय २४ रा. जयभवानीनगर, सांगवी बु.नांदेड ता.जि.नांदेड नागेश गुलाबसिंग ठाकुर जन्म दिनांक स्वतः १६-०२-२००१ रोजी वाघमारे हॉस्पिटल बाबा नगर नांदेड येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.
तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २९/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.
सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक २३-११-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

स्वाक्षरित/-
के.डी.कनिष्ठ लिपीक
६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

शिवणीत जलजीवन मिशनचे काम चार वर्षांपासून अर्धवट

सरपंच सौ.लक्ष्मीबाई डुडूळे यांनी दिला उपोषणाचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-शिवणी येथील जलजीवन मिशन योजनेतील अर्धवट काम करुन ग्रामस्थांना हक्काच्या शुद्ध पाण्यापासून मागील चार वर्षांपासून वंचित ठेवले आहे. पाण्याची टाकी उभी पण विहिरीचे काम अर्धवटच. जलवाहिनी टाकण्यासाठी संपूर्ण रस्ते खोदून टाकलीत. मात्र अनेक भागांत जलवाहिनी न्या टाकल्या नाहीत. तात्पर्य असे की, करोडोंच्या विकासनिधीवर हात फिरवून कंत्राटदाराने मारली दांडी. या प्रकरणी तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अन्यथा उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल असा इशारा सरपंच सौ.लक्ष्मीबाई निळकंठ डुडूळे यांनी दिलाय.





केंद्र शासनाच्या हर घर नल या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेंतर्गत प्रत्येक घराला नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, किनवट तालुक्यातील शिवणी येथे या योजनेचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले असल्याने ग्रामस्थांना अद्यापही नियमित नळाद्वारे पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे शासनाच्या जलजीवन मिशन योजनेचा प्रत्यक्ष लाभ शिवणीकरांना कधी मिळणार, असा प्रश्न सरपंचांसह ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. शिवणी गावात जलजीवनच्या जलवाहिनीच्या कामासाठी गावातील बहुतांश रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात आलीय. मात्र, गावातील काही भागांत अद्याप पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही. गावात पाण्याची टाकी उभी करण्यात आली आहे. मात्र तांत्रिक दृष्ट्या सदोष काम असल्यामुळे पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. तसेच पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या विहिरीचे कामही अद्याप अर्धवट अवस्थेत आहे. २२ ऑक्टोबर रोजी सरपंच सौ.लक्ष्मीबाई डुडूळे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे नांदेड येथील कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, जिल्हाधिकाऱ्यांसह राज्य सरकारला पत्र व्यवहार केला आहे.

कुंडलवाडी येथे हरिनाम सप्ताहचे आयोजन

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी येथे वंजार गल्लीमध्ये समस्त वंजारी समाज बांधवाच्या पुढाकारातून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या द्वितीय वर्षानिमित्त हरिनाम सप्ताह श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

मंदिराची उभारणी अवघ्या दिड वर्षात मंदिराचे बांधकाम पूर्ण करून २६ नोव्हें. २०२५ रोजी श्री विठ्ठल-रुक्मीणी मुर्तीची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. यंदा मंदिराच्या द्वितीय वर्षानिमित्त २१ नोव्हें. ते २८ नोंव्हेबर या कालावधीत हरिनाम सप्ताह श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मीक सोहळ्यात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६.३० ते ९ वा. ज्ञानेश्वरी पारायण सकाळी १० ते १२ तसेच दुपारी २ ते ४ श्रीमद् भागवत कथा, सांयकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ७ ते ९ हरिकिर्तन व जागर असे दैनदिन कार्यक्रम होत आहेत. दि.२७ रोजी संतोष पुरी महाराज चोळाखेकर तर २८ रोजी हभप श्रीराम महाराज पांगरेकर यांचे किर्तन होणार आहे. शनिवार २८ नोंव्हेबर रोजी सकाळी ९ वा.काल्याच्या किर्तना नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

बेशिस्त ऑटो चालकांवर पोलीसांची कारवाई

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील सार्वजनिक रस्त्यावर मनमानी पद्धतीने ऑटो उभे करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या ऑटो चालकाविरुद्ध देगलूर पोलीस आणि कारवाईचा बडगा उभारला आहे. दि.२६ नोव्हेंबर रोजी तीन ऑटोचालकाविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

देगलूर ते उदगीर मार्गावरील जुने बस स्थानक परिसरात सकाळी रमेश गायकवाड (५५, रा. कावळगाव) याने त्यांच्या ताब्यातील ऑटो क्र.एम. एच. २६ ए. सी. ३०५३ रस्त्याच्या मध्यभागी उभा केला होता. जुने बस स्थानकासमोर सकाळी मंगेश बोडके (वय ३०, रा. बोरगाव) याने ऑटो क्र.एम.एच-२६ २२३७ सार्वजनिक रस्त्याच्या मध्यभागी उभा करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याचे आढळले. साठे चौक परिसरात दु.१२ वा. मन्मथ एकलारे (२२, रा.बामणी, ता.मुखेड, ह. मु. सांगवी (क), ता.देगलूर याने ऑटो क्र. एम. एच. २६ ए. एसी. ४५३९ रस्त्याच्या मध्यभागी उभा करून वाहनांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याचे पोलिसांना आढळले. या तीनही ऑटो चालकाविरुध्द देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संविधानातील मूलभूत हक्क व महत्त्वाचा जागर आवश्यक-प्रवीण पाटील

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले मूलभूत हक्क आणि लोकशाही मूल्यांची जाणीव समाजातील प्रत्येक घटकाला होणे आवश्यक आहे. संविधानातील तरतुदी केवळ पुस्तकांपुरत्या मर्यादित न राहता त्यांचा प्रत्यक्ष जीवनात जागर झाला पाहिजे, असे प्रतिपादन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी केले.

संविधान दिनानिमित्त सायन्स कॉलेज, नांदेड येथे स्थापन करण्यात आलेल्या संविधान विंगच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संविधानाच्या उद्देशिकेचा फ्लेक्स अनावरण करून डॉ. पाटील यांच्या हस्ते या विंगचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिव प्रा. श्यामलताई पत्की उपस्थित होत्या. संविधानातील कलम १५, १७, १९ आणि २१ ही केवळ कायद्यातील कलमे नसून प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाशी आणि सामाजिक व्यवहाराशी जोडलेली आहेत. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमधून संविधानातील मूल्यांचे आचरण झाले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी संविधान विंग उपयुक्त ठरेल, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.यावेळी प्रा. श्यामलताई पत्की म्हणाल्या की, संविधान दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम म्हणून साजरा करण्याचा दिवस नसून संविधानातील मूल्ये प्रत्यक्ष जीवनात अंगीकारण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. संविधानातील विचार प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी निगडित असून, त्यांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पीपल्स महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड यांनी संविधानाचे



विविध पैलू, घटनादुरुस्त्या आणि बदलती राजकीय परिस्थिती यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. एकनाथ खिल्लारे यांनी केले. प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे यांनी उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. उपप्राचार्या डॉ. अरुणा शुक्ला यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. सूत्रसंचालन डॉ. प्रशांत सुतकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सतीश बैनवाड यांनी केले. यावेळी दीपनाथ पत्की, सिनेट सदस्य डॉ. ए. टी. शिंदे, विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

हदगाव शहरवासीयांना फेब्रुवारी पर्यंत पुरेल इतका पाणीसाठा आरक्षित

मुख्याधिकारी वांडेकर यांची माहिती

हदगांव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, यासाठी नगर परिषदेच्या वतीने नियोजनबद्ध पाणी पुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. शहराला फेब्रुवारी २०२७ पर्यंत पुरेल इतका पाणीसाठा आरक्षित करण्यात आला असून नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. मात्र, सध्याची परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने व जपून वापर करावा, असे आवाहन हदगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले आहे.



याबाबत अधिक माहिती देताना मुख्याधिकारी वांडेकर म्हणाले की, हदगाव शहराला दररोज सुमारे १२ लाख लिटर पाण्याची आवश्यकता असते. ही गरज लक्षात घेऊन फेब्रुवारी २०२७ पर्यंत पुरेल अशा पाणीसाठ्याचे आरक्षण करण्यात आले आहे. त्या नंतर ही आपण आरक्षित पाण्याचा साठा आहे न.पा. नगराध्यक्ष रोहिणी वानखेडे, उपनगराध्यक्ष सुनंदा भोळे तसेच नगरसेवकांनी केलेल्या सूचनांचा विचार करून पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची चिंता भेडसावू नये, यासाठी नगरपरिषदेच्या पथकाकडून गेल्या अनेक दिवसांपासून विशेष प्रयत्न सुरू आहेत. शहरापासून अंदाजे सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या नदीपात्रात वाळूच्या पोत्यांचा बंधारा उभारण्यात आला आहे. या कामासाठी नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक सतीश देशमुख, पाणीपुरवठा अभियंता शिरसाट व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. नगरपरिषद प्रशासनाच्या या नियोजनामुळे शहराच्या पाणी पुरवठ्याबाबत दिलासा मिळाला असून नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले आहे.

डॉ.गंगाधर तोगरे यांना शिवा राष्ट्रीय भूषण पत्रकार पुरस्कार प्रदान

कंधार/प्रतिनिधी-शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार डॉ.गंगाधर तोगरे यांना श्री क्षेत्र कपिलधार जि.बीड येथे मान्यवरांच्या हस्ते दि.२४ नोव्हेंबर रोजी आयोजित भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

यावेळी शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे, विविध मठाचे शिवाचार्य महाराज आंदीच्या



हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. मन्याड खोऱ्यात गत अडीच दशकापासून डॉ.गंगाधर तोगरे यांनी ऐतिहासिक, शैक्षणिक, आरोग्य, कृषी, राजकीय आदी विषयासह सामान्य, शेतकरी, शेतमजूर भटके विमुक्त, उपेक्षित, वंचित आदी समाजाच्या प्रश्नांना उजागर करून लक्ष वेधून घेत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारितेचा उपयोग केला. या पुरस्कार वितरण समारंभाला प्रा.मनोहर धोंडे, सिद्ध दयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर, गुरूराज स्वामी अहमदपूरकर, सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर, विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मानुरकर, संगाबस्व शिवाचार्य महाराज निलंगेकर, काशीनाथ शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपाळकर, प्रभुलिंग शिवाचार्य महाराज शिरड शहापूरकर, महातेकर शिवाचार्य महाराज, शि.भ.प. भगवंतराव पा.चांभरगेकर यांच्यासह अनेक मान्यंवर उपस्थित होते.

वीज ग्राहक फुलसिंग ठाकूर यांना अभय योजनेत ३ लाखाची सवलत

नांदेड/प्रतिनिधी-वीज बिलांच्या थकबाकीमुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित बिगरकृषी वीजग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना २०२६-२७' सुरु असून योजनेला नांदेड शहरासह परिमंडलात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तब्बल ४ लाख ९४ हजार १७० रुपयांच्या थकबाकी पोटी कायम वीज पुरवठा खंडित असलेल्या नांदेड शहरातील फुलसिंग बंकतसिंग ठाकूर या ग्राहकाला केवळ १,८६,३८० रुपयांचा एकरक्कमी भरणा करावा लागला. ठाकूर यांना तब्बल ३ लाख,०७ हजार ७९० रुपयांची घसघशीत सवलत मिळाली आहे. सदर ग्राहकाने अर्ली बर्ड स्कीमचाही फायदा घेतला आहे.

मुख्य अभियंता श्री. राजाराम माने आणि अधीक्षक अभियंता संजय खंडारे यांच्या सुचनेनुसार अतिरिक्त कार्यकारी अभियंता महेश वाघमारे आणि त्यांच्या पथकाने अभय मिळालेले ग्राहक फुलसिंग ठाकूर यांचा योजनेतील सहभागाबदल शुक्रवारी (२७ नोव्हेंबर) सत्कार केला.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

पत्ता : वजीराबाद,नांदेड ई-मेल पत्ता info@nwcmcnanded.org दुरध्वनी -(०२४६२) २३४०४

ई निविदा सूचना क्र.नांवाशमनपा/विद्युत/११८१८/२०२६ दिनांकः २६/११/२०२६

आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याकडुन नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडुन १.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१५ (अ) येथील विविध ठिकाणी मिनी हायमास्ट व LED Lights बसविणे (मनपा निधी) २.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१५ (ड) येथील विविध ठिकाणी मिनी हायमास्ट व LED Lights बसविणे (मनपा निधी) या कामासाठी ब-१ नमुन्यात निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर (http://mahatenders.gov.in) येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा अटी, शर्ती व ई निविदाची सर्व माहीती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

स्वा/-
शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

पान १ वरुन

न्याव्यवस्थेतील प्रतिनिधित्वावर...

कलम १२४(२) नुसार सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते. मात्र, गेल्या काही दशकांपासून कॉलेजियमच्या शिफारशींना नियुक्ती प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

नरसी फाट्यावर गुटखा विक्रीला...

चालते? विक्रेत्यांना गुटख्याचा पुरवठा कोण करतो? २५ ते ३० गावांपर्यंत दररोज होणाऱ्या कथित पुरवठ्यामागे कोण आहे? बंदी असलेल्या पदार्थांची विक्री होत असताना संबंधित यंत्रणांचे लक्ष याकडे का जात नाही? असे प्रश्नही उपस्थित होत आहेत.अन्न व औषध प्रशासनाने तसेच संबंधित पोलीस यंत्रणेने नरसीफाटा परिसरातील गुटखा विक्रीची प्रत्यक्ष तपासणी करून साठा आणि पुरवठा साखळीचा शोध घ्यावा. दोषी विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.बंदी कागदावर आणि विक्री बाजारात, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये; प्रशासनाने तातडीने कारवाई करून या कथित गुटखा पुरवठा साखळीचा पर्दाफाश करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

डिलिमिटेशन आणि महिला आरक्षण...

लोकसभेच्या जागांमधील वाढ आणि राज्यांचे राजकीय प्रतिनिधित्व या मुद्द्यांवरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये संघर्ष होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे विशेष अधिवेशनात या घटनादुरुस्ती विधेयकाला कितपत पाठिंबा मिळतो, हे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे यावेळी विधेयक मंजूर होणार का, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. लोकसभेचे कामकाज ३० नोव्हेंबरपासून, तर राज्यसभेचे कामकाज २ डिसेंबरपासून सुरू होणार असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी दिली आहे. आगामी संसदीय अधिवेशनात महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा केंद्रस्थानी राहणार आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेवर शरद पवार...

यांनी या विधेयकाबाबत पक्षाची अधिकृत भूमिका लोकसभेतील चर्चेच्या वेळी स्पष्ट केली जाईल, असे त्यांनी सांगितले. सुप्रिया सुळे यांच्या या विधानामुळे शरद पवार गटाचा प्रस्तावित विधेयकाला पाठिंबा आहे की विरोध, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

नांदेडमध्ये ऑनलाइन खत...

तालुक्यातील गुणनियंत्रण अधिकाऱ्यांमार्फत तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत कृषी सेवा केंद्रांवरील विक्री यंत्रातील ऑनलाइन खत साठा आणि प्रत्यक्ष गोदामातील खत साठा यांची पडताळणी करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यात ऑनलाइन खत खरेदी-विक्री प्रणाली अधिक प्रभावीपणे कार्यरत असून, शेतकऱ्यांचा या सुविधेला वाढता प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी दिली आहे.

प्रशांत राठोड मित्रमंडळ जि.प.व...

समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभावशाली समिकरण निर्माण करु पहात असल्याच्या चर्चांचा नव्यानेच पेव फुटला आहे. किनवट विधानसभा मतदारसंघातील परिवर्तनवादी सुजाण मतदारांनी अशा मित्रमंडळाच्या अनेक निवडणूका पाहिल्या. मात्र त्यांना मतदारांनी स्विकारले नसल्याचाही एक अभेद्य इतिहास घडविलाय. डॉ.अशोक पाटील सुर्यवंशी आणि धरमसिंग राठोडांना भाजपाचा बलाढ्य वरदहस्त असतांना राजकीय उष:काल पहायला मिळाला नाही. यादव जाधवांनीही प्रथम भाजपा आणि नंतर काँग्रेस अशी तळ्यातमळ्यातची भूमिका घेतल्याने तेही टिकू शकले नाहीत. आतातर पस्तीस वर्षाचा सामाजिक कार्याचा वसा घेऊन निवडणूक रिंगणात उतरु पहाणारे प्रशांत राठोड यांच्या मित्रमंडळामध्ये राजनैतिक समिकरण बदलेल एवढा अवसान असेल तर आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पहायला मिळणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४